RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ७३ (२)] बुधवार, मे ३१, २०२३/ज्येष्ठ १०, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २११**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ मे २०२३

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.**

क्रमांक संकीर्ण-२०२३/प्र.क्र.९८/ विशि-३.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. अधिनियम क्रमांक ६) याच्या कलम ७२ च्या पोट-कलम (१०) यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून तसेच कलम १२४ ची पोट-कलमे (२) व (३) मधील तरतुदीनुसार, महाराष्ट्र शासन, याद्वारे, स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थेचा दर्जा देण्याची व तो चालू ठेवण्याची मानके व कार्यपद्धती, प्राधिकरणे व मंडळे गठित करणे आणि अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचे अधिकार व कार्ये यांच्याशी संबंधित असणारे पुढील एकरूप परिनियम विहित करीत आहे :—

**२०२३ चा एकरूप परिनियम क्रमांक २**

**१. संक्षिप्त नाव, प्रयुक्ती व प्रारंभ.—**

(१) या परिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थेचा दर्जा देण्याची व तो चालू ठेवण्याची मानके व कार्यपद्धती, प्राधिकरणे व मंडळे गठित करणे आणि अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचे अधिकार व कार्ये) एकरूप परिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) हे परिनियम, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. अधिनियम क्रमांक ६) याखालील, महाराष्ट्र राज्यातील विद्यापीठांच्या अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थेचा दर्जा प्रदान करण्याची मागणी करणाऱ्या, सर्व संलग्न स्वायत्त महाविद्यालयांना लागू असतील.

(३) हे परिनियम, महाराष्ट्र शासनाच्या **राजपत्रामध्ये** ही अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून, अंमलात येतील.

**२. पात्रता.—**

जर संलग्न स्वायत्त महाविद्यालयांस किंवा मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्थेंस,—

(१) राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेने, ३.०१ किंवा त्यापेक्षा अधिक संचयी श्रेणी श्रेयांक सरासरीसह वैध मानांकन दिलेले असेल किंवा त्या महाविद्यालयाद्वारे किंवा परिसंस्थेद्वारे राबविण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमांपैकी किमान साठ टक्के अभ्यासक्रमांना, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाकडून अधिस्वीकृती किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाने नामिकाप्रविष्ट केलेल्या कोणत्याही अभिकरणाकडून तत्सम अधिस्वीकृती श्रेणी देण्यात आलेली असेल तर; आणि

(२) संलग्न स्वायत्त महाविद्यालय किंवा स्वायत्त मान्यताप्राप्त परिसंस्था म्हणून ते किमान पाच वर्षांपासून कार्यरत असेल तर,

त्या संलग्न स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा स्वायत्त मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या गटाचे व्यवस्थापन, अशा संलग्न स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्थांच्या गटाला अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा देण्यासाठी, विद्यापीठाकडे अर्ज करण्यास पात्र असेल.

**३. अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा देण्याची कार्यपद्धती.—**

(१) अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा मिळण्याची इच्छा असणारा संलग्न स्वायत्त महाविद्यालयांचा किंवा स्वायत्त मान्यताप्राप्त परिसंस्थांचा गट, यासोबत जोडलेल्या जोडपत्रामध्ये विहित केलेल्या नमुन्यात विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुकडे पंचवीस हजार रुपये शुल्कासह अर्ज करील, जे प्रत्येक दहा वर्षांनंतर पन्नास टक्क्यांनी वाढविण्यात येईल.

(२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्याची व तो चालू ठेवण्याची मानके व कार्यपद्धती, प्राधिकरणे व मंडळे गठित करणे आणि अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयांचे अधिकार व कार्ये) एकरूप परिनियम, २०२३, यात विहित केलेली कार्यपद्धती, संलग्न महाविद्यालयांच्या किंवा स्वायत्त मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या गटास अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा देण्यासाठी, योग्य त्या फेरफारांसह, लागू असेल.

**४. अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा देण्याचा कालावधी.—**

संलग्न स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा मान्यताप्राप्त स्वायत्त समूह परिसंस्थांच्या गटास सुरूवातीला एका वेळी दहा वर्षांच्या कालावधीकरिता अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा देण्यात येईल. खंड ३ मधील विहित केलेल्या कार्यपद्धतीस आणि नमूद केलेल्या कालमर्यादेस अधीन राहून, दहा वर्षांच्या पुढील कालावधीकरिता तो चालू ठेवता येईल.

**५. अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा चालू ठेवणे.—**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (स्वायत्त महाविद्यालयांना अधिकारप्रदत्त स्वायत्त महविद्यालयाचा दर्जा देण्याची व तो चालू ठेवण्याची मानके व कार्यपद्धती, प्राधिकरणे व मंडळे गठित करणे आणि अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयांचे अधिकार व कार्ये) एकरूप परिनियम, २०२३, यात विहित केलेली कार्यपद्धती, संलग्न स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा त्याच व्यवस्थापनाच्या मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या गटास, अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा देण्यासाठी योग्य त्या फेरफारांसह लागू असेल.

**६. अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांची प्राधिकरणे व मंडळे गठित करणे.—**

अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांची प्राधिकरणे किंवा मंडळे ही, स्वायत्त दर्जा असणाऱ्या महाविद्यालयांकरिता, वेळोवेळी, विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केल्याप्रमाणे असतील.

**७. अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचे अधिकार व कार्ये.—**

(१) अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्था, विद्यापीठ अनुदान आयोगाने, स्वायत्त दर्जा असलेल्या महाविद्यालयांसाठी वेळोवेळी विहित केलेल्या अधिकारांचा वापर करील आणि कार्ये पार पाडील आणि प्रशासकीय, विद्याविषयक, वित्तीय व इतर कार्ये करील.

(२) अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांना, विद्यापीठाशी संलग्नता असलेली संयुक्त पदवी प्रदान करण्याचा अधिकार प्रदान केला आहे. पदवी प्रमाणपत्रावर, संलग्न विद्यापीठाचे व अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचे नाव व चिन्हे (लोगो) असतील.

(३) अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्था, स्वायत्त संलग्न महाविद्यालय किंवा स्वायत्त मान्यताप्राप्त परिसंस्था वापरीत असलेल्या विशेषाधिकारांशिवाय, राज्य शासनाने व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या अशा सर्व विशेषाधिकारांचा वापर करील.

**८. सर्वसाधारण तरतुदी.—**

(१) विद्यार्थ्यांना, अंशतः एका अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांमध्ये आणि अंशतः इतर दुसऱ्या अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांमध्ये किंवा अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रमाचे अध्ययन करता येईल.

(२) अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्था, संबंधित विद्यापीठाची संलग्नता किंवा मान्यता चालू ठेवील.

(३) अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांच्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना, संबंधित पाठ्यक्रमास त्यांनी प्रवेश घेतल्याचे दिनांक लक्षात न घेता, संलग्न विद्यापीठ, व अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्था यांची नावे व चिन्हे (लोगो) असणारे संयुक्त पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

(४) स्वतंत्र स्वायत्त संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था, अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर, त्याची/तीची स्वतःची मूळ ओळख टिकवून ठेवील.

(५) स्वतंत्र संलग्न स्वायत्त महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्थेच्या अंतर्गत असलेल्या सफाई काम, सुरक्षा सेवा, ग्रंथालय, क्रीडा, प्रयोगशाळा, वाहनतळ, मैदान व वर्ग यांसारख्या सर्व सोयीसुविधा, अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांच्या एकाच छताखाली आणण्यात येतील. स्वतंत्र संलग्न स्वायत्त महाविद्यालयांतील किंवा मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्थांमधील सोयीसुविधांचा, अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थामधील विद्यार्थ्यांच्या संपूर्ण लाभासाठी इष्टतम वापर करण्यात येईल, जेणे करून, स्वतंत्र संसाधनांवरील खर्च कमी होईल आणि सामाईक सुविधांचा, सर्व विद्यार्थ्यांना लाभ होईल.

(६) विद्यापीठ अनुदान आयोग (महाविद्यालयांना स्वायत्त दर्जा प्रदान करणे आणि स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा राखण्याच्या उपाययोजना) विनियम, २०२३ यानुसार विहित केलेल्या स्वायत्त संलग्न महाविद्यालयांना, लागू असलेल्या सर्व तरतुदी, वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांना लागू असतील.

(७) राज्य शासन, शासन अनुदानित स्वायत्त संलग्न महाविद्यालयांना किंवा मान्यताप्राप्त संस्थांना अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा प्रदान करण्यापूर्वी, जी अनुदाने किंवा निधी देण्यात येत होता तीच अनुदाने किंवा निधी त्यांना देण्याचे चालू ठेवील.

## जोडपत्र

## अधिकारप्रदत्त स्वायत्त समूह परिसंस्थांचा दर्जा देण्याबाबतच्या अर्जाचा नमुना

[ खंड ३ (१) **पहा** ]

| अ. क्र. | तपशील | माहिती | |
|---|---|---|---|
| १ | प्रत्येक संलग्न स्वायत्त महाविद्यालयाचे / मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्थेचे नाव व पत्ता | | |
| २ | संपर्काचा तपशील (दूरध्वनी क्रमांक, ई-मेल, इत्यादी.) | | |
| ३ | संलग्नता असणारे विद्यापीठ | | |
| ४ | प्रत्येक संलग्न स्वायत्त महाविद्यालयाचे / मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्था स्थापन केल्याचे वर्ष | | |
| ५ | राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेची (नॅक) अधिस्वीकृती (प्रत जोडावयाची आहे) (प्रत्येक संलग्न स्वायत्त महाविद्यालय / मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्था यांची) | वैधतेचा कालावधी | श्रेणी |
| ६ | राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाची (एनबीए) अधिस्वीकृती (प्रत जोडावयाची आहे) (प्रत्येक संलग्न स्वायत्त महाविद्यालय / मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्था यांची) | वैधतेचा कालावधी | श्रेणी |
| ७ | इतर कोणत्याही अधिस्वीकृती अभिकरणाने दिलेली अधिस्वीकृती (प्रत जोडावयाची आहे) (प्रत्येक संलग्न स्वायत्त महाविद्यालय / मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्था यांची) | वैधतेचा कालावधी | श्रेणी |
| ८ | प्रत्येक संलग्न स्वायत्त महाविद्यालयाचा / मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्थेचा प्रकार (शासकीय/ खाजगी अनुदानित/ खाजगी विनाअनुदानित) | | |
| ९ | संलग्न स्वायत्त महाविद्यालयाद्वारे / मान्यताप्राप्त स्वायत्त परिसंस्थेद्वारे चालविण्यात येणाऱ्या पाठ्यक्रमांचा तपशील | पाठ्यक्रम | कालावधी |
| १० | अधिकारप्रदत्त स्वायत्त दर्जा देण्याकरिता प्रदान केलेल्या शुल्काचा तपशील | | |

स्वायत्त संलग्न महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाचा अध्यक्ष/सचिव,

....................................

(स्वाक्षरी व मोहोर).

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विकास चंद्र रस्तोगी,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.